**शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्ता व दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**

शासन निर्णय क्रमांक - प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२, दिनांक ०३ मार्च, २०१०.

पहा:- (१) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१०९८/प्र.क्र.७४/९८/सेवा-५, दिनांक ४ डिसेंबर, १९९९

(२) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१०९८/प्र.क्र.७४/९८/सेवा-५, दिनांक ७ डिसेंबर, १९९९

(३) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.८०सेवा-५, दिनांक ६ जानेवारी, २००६

(४) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.१७/सेवा-५, दिनांक १९जून, २००६

(५) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.१७/सेवा-५, दिनांक ११ डिसेंबर, २००६

(६) शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक:प्रवास-१००५/प्र.क्र.१७/सेवा-५, दिनांक १०जानेवारी, २००७

(७) भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्रमांक:एफ क्र.१९०३०/३/२००८-ई-चार, दिनांक २३सप्टेंबर, २००८.

## शासन निर्णय

सहाव्या केंद्रिय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने केंद्र शासनाने केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रवास भत्त्याच्या दरामध्ये वरील (७) येथील दिनांक २३सप्टेंबर, २००८ च्या आदेशान्वये सुधारणा केली आहे. राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांच्या प्रवास भत्त्याच्या दरात त्याप्रमाणे सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या काही काळ विचाराधिन होता.

शासन आता असे आदेश देत आहे की, दौरा आणि बदलीशी संबंधित प्रवास भत्त्यांच्या नियमांतील विशिष्ट तरतूदी व दर खालील परिच्छेदांत दर्शविल्याप्रमाणे सुधारण्यात येत आहेत. प्रवास भत्ता नियमांच्या / आदेशांच्या अन्य तरतूदी पूर्वीप्रमाणेच अंमलात राहतील. शासन असेही आदेश देत आहे की, प्रवासभत्ता विषयक सर्व तरतूदी काटकसरीच्या उपाययोजनांसंबंधीच्या सध्याच्या तसेच भविष्यात काढल्या जाणाऱ्या आदेशांच्या अधीन अंमलात राहतील.

२. **(अ)** या आदेशांच्या प्रयोजनार्थ "वेतन" म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २००९ अन्वये लागू करण्यात आलेल्या सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतन (वेतनबँडमधील वेतन + ग्रेड वेतन) होय.

**(ब)** जे कर्मचारी असुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन घेतील त्यांच्या बाबतीत विविध भत्त्यांची रक्कम परिगणित करताना त्यांनी धारण केलेल्या पदाचे सुधारित वेतनसंरचनेतील ग्रेड वेतन विचारात घेण्यात यावे.

असुधारित वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याबाबतीत संयुक्त बदली अनुदानाची परिगणना करण्याच्या प्रयोजनार्थ त्यांचे वेतन म्हणजे असुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतन आणि दिनांक १ जानेवारी, २००६ रोजी लागू असणाऱ्या दराने अनुज्ञेय महागाई भत्ता होय.

**(क) <u>या आदेशांतील प्रवासभत्ताविषयक तरतुदींच्या प्रयोजनार्थ कर्मचारी प्रत्यक्ष धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन विचारात घेण्यात यावे. कर्मचाऱ्यांना आर्थिक लाभ देण्याच्या दृष्टीने अंमलात असलेल्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत मंजूर केलेल्या उच्च वेतन संरचनेतील ग्रेड वेतन या आदेशातील विविध भत्त्यांच्या मंजुरीच्या प्रयोजनार्थ विचारात घेण्यात येऊ नये. मात्र, ज्या पदांच्या बाबतीत विशिष्ठ कालावधीच्या सेवेनंतर अकार्यात्मक (Non-functional) उच्च वेतनसंरचना मंजूर करण्यात येते अशा पदधारकांच्या बाबतीत, त्या उच्च वेतनसंरचनेतील ग्रेड वेतन या आदेशातील विविध भत्त्यांच्या मंजुरीच्या प्रयोजनार्थ विचारात घेण्यात यावे.</u>**

**३. <u>शासकीय कर्मचाऱ्यांची वर्गवारी (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ३७७)</u>:-**
वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील परिच्छेद **३** मधील तरतूद सुधारून, सुधारित वेतनसंरचनेच्या अनुषंगाने दौऱ्यावरील व बदलीच्या प्रवासभत्त्याच्या नियमनासाठी शासकीय कर्मचाऱ्यांची वर्गवारी खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे:-

| श्रेणी | सुधारित वेतनसंरचनेतील ग्रेड वेतन |
|---|---|
| प्रथम श्रेणी | रुपये ६,६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) |
| द्वितीय श्रेणी | रुपये ४,४००/- व त्याहून अधिक मात्र रू.६,६००/-पेक्षा कमी |
| तृतीय श्रेणी | रुपये ४,४००/- पेक्षा कमी |

**४. <u>निरनिराळ्या प्रवास साधनांतील जागेच्या वर्गासाठीची पात्रता</u>:**

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील परिच्छेद ४ मधील तरतूद सुधारून, सुधारित वेतन संरचनेच्या अनुषंगाने शासकीय कर्मचाऱ्यांची स्वेच्छानिर्णयानुसार दौऱ्यावरील व बदली निमित्ताच्या विमान प्रवासासाठी आणि रेल्वे, सार्वजनिक बसेस व बोट यांच्यामधील वेगवेगळ्या जागेच्या वर्गासाठीची पात्रता खालीलप्रमाणे विहित करण्यात येत आहे:-

**४.१. <u>विमान प्रवास (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४१७-ब आणि ४९०)</u>**

विमान प्रवाससंबंधी तरतूदी पुढीलप्रमाणे लागू राहतील:-

अ) सचिवांपेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही. सचिव व सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांना फक्त इकॉनॉमी क्लासनेच विमान प्रवास अनुज्ञेय राहील.

प्रधान सचिव व त्याहून उच्च दर्जाच्या अधिकाऱ्यांना एअर इंडिया व इंडियन या विमान कंपन्यांच्या विमानाने एक्झिक्युटिव्ह क्लासने विमान प्रवास अनुज्ञेय राहील. मात्र इकॉनॉमी वर्गाचा प्रवास कोणत्याही विमान कंपनीच्या विमानाने अनुज्ञेय राहील.

वरील अधिकाऱ्यांनी विमानप्रवासाची तिकीटे इंटरनेटवर उपलब्ध ई-तिकीट सेवेद्वारे काढावीत. यासाठी आकारण्यात येणाऱ्या आनुषंगिक खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. इकॉनॉमी वर्गाच्या पूर्ण दराची (Full Fare Economy Tickets) तिकीटे काढू नयेत.

ब) विमानप्रवास अनुज्ञेयतेविषयी अंमलात असलेले सध्याचे शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.प्रवास-१००३/प्र.क्र.३८/सेवा-५, दि.२० एप्रिल, २००४, शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.प्रवास-१००५/प्र.क्र.५३/सेवा-५, दि.२७ सप्टेंबर, २००५ व शासन निर्णय, गृह विभाग,

क्र.आयपीएस-२६०५/प्र.क्र.६३०/पोल-१, दि.६ नोव्हेंबर, २००६ हे विशेष आदेश यापुढेही अंमलात राहतील.

**तसेच, विमानप्रवाससंदर्भातील अमेरिकन एक्सप्रेस इंडियन एअरलाइन्स गोल्ड / सिल्व्हर (ग्रीन) कार्डची सुविधा रद्द करण्यात येत आहे.**

क) न्यायालयीन तसेच विधीमंडळ कामकाजासाठी इतर कोणत्याही साधनाने / मार्गाने वेळेत पोहोचणे शक्य नसल्यास, अशा प्रसंगी संबंधित प्रशासनिक विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीने विमानप्रवास करता येईल. मात्र असा प्रवास करताना प्रथम अल्प दराने विमान सेवा पुरविणाऱ्या विमान कंपनांच्या विमानाने प्रवासास प्राधान्य देण्यात यावे. अशा कंपनीच्या विमानाचे तिकीट उपलब्ध न झाल्यास सर्वसाधारण विमान कंपन्यांच्या इकॉनॉमी क्लासने विमान प्रवास करता येईल. परतीच्या प्रवासासाठी ही सवलत यापुढे अनुज्ञेय असणार नाही. तथापि, अपवादात्मक परिस्थितीत परत येणे तातडीचे असेल तर प्रशासनिक विभागाच्या सचिवांच्या लेखी पूर्वपरवानगीनेच वरीलप्रमाणे विमानप्रवास करता येईल. प्रशासनिक विभागाच्या सचिवांनी उपरोक्त कारणांसाठी अवर सचिव आणि त्यापेक्षा उच्च दर्जाच्या मंत्रालयीन व क्षेत्रीय अधिकाऱ्यांनाच विमान प्रवासास परवानगी द्यावी. इतर कोणत्याही कारणांसाठी विमानप्रवास अनुज्ञेय असणार नाही.

ड) तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या खाजगी सचिवांना, ते मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांचेसोबत प्रवास करीत असतील तरच आणि मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या पूर्व परवानगीनेच इकॉनॉमी क्लासने विमानप्रवास अनुज्ञेय राहील. मंत्री व राज्यमंत्री यांचे आस्थापनेवरील खाजगी सचिव / स्वीय सहाय्यक यांना तसेच मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या आस्थापनेवरील स्वीय सहाय्यकांना विमान प्रवास अनुज्ञेय असणार नाही.

## ४.२ रेल्वे प्रवास (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४०० आणि ४९०):-

सुधारित वेतन संरचनेच्या अनुषंगाने दौऱ्यावरील व बदलीनंतरच्या रेल्वे प्रवासासंबंधीची पात्रता पुढीलप्रमाणे असेल:-

**"तक्ता - अ"**

| श्रेणी | शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | प्रवास पात्रता - ऑर्डिनरी मेल, एक्सप्रेस पॅसेंजर ट्रेन आणि अन्य सुपर फास्ट ट्रेन्स |
|---|---|---|
| प्रथम श्रेणी | अ) रु.८,९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) | वातानुकुलित प्रथम वर्ग / वातानुकूलित २-स्तर शयनयान. |
| | ब) रु.६,६००/- व त्याहून अधिक मात्र रु.८,९००/- पेक्षा कमी | द्वितीय वर्ग वातानुकुलित २ -स्तर शयनयान/ प्रथम वर्ग/वातानुकूलित खुर्ची यान |
| द्वितीय श्रेणी | अ) रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी * | प्रथम वर्ग/वातानुकुलित ३ -स्तर शयनयान/ वातानुकुलित खुर्ची यान / द्वितीय वर्ग शयनयान. |
| तृतीय श्रेणी | अ)रु.४,२००/-व त्याहून अधिक मात्र रु.४,४००/- पेक्षा कमी ** | वातानुकुलित खुर्ची यान / द्वितीय वर्ग शयनयान. |
| | ब) रु.४,२००/- पेक्षा कमी | द्वितीय वर्ग शयनयान |

* **टीप:- १)** ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी, प्रवासाचे सुरुवातीचे व शेवटचे ठिकाण अखंडीतपणे व सर्वात जवळच्या मार्गाने जोडणा-या कोणत्याही रेल्वेमध्ये त्यांना अनुज्ञेय ठरविण्यात आलेले वर्ग उपलब्ध नसल्यास, वातानुकूलित २-स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

** टीप:- २) ग्रेड वेतन मर्यादेतील राजपत्रित अधिकारी प्रथम वर्गाने, वातानुकुलित३-स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

टीप:- ३) रेल्वेच्या प्रथम वर्गाने अथवा कोणत्याही वातानुकुल वर्गाने केलेल्या प्रवासाच्या प्रकरणी प्रवासभत्ता देयकात तिकीट क्रमांक, दिनांक इत्यादी तपशील नमूद करणे आवश्यक असेल.

**"तक्ता -ब"**

| श्रेणी | शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | प्रवास पात्रता | |
|---|---|---|---|
| | | राजधानी एक्सप्रेस | शताब्दी एक्सप्रेस |
| प्रथम श्रेणी | अ) रु.८,९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) | वातानुकुलित प्रथम वर्ग/द्वितीय वर्ग वातानुकुलित २ - स्तर शयनयान. | एक्झिक्युटिव्ह क्लास |
| | ब) रु.६,६००/- व त्याहून अधिक मात्र रु.८,९००/- पेक्षा कमी | द्वितीय वर्ग वातानुकुलित २ -स्तर शयनयान | वातानुकुलित खुर्ची यान. |
| द्वितीय श्रेणी | रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी * | वातानुकुलित खुर्ची यान. | ----- |

* टीप-१:- या ग्रेड वेतन मर्यादेतील शासकीय कर्मचारी वातानुकुलित खुर्ची यान पुरविलेले नसल्यास वातानुकुलित ३ स्तर शयनयानाने प्रवास करण्यास पात्र असतील.

टीप-२:- जेव्हा भोजनाची व नाश्त्याची विनामुल्य सोय असलेल्या <u>कोणत्याही गाडीने</u> प्रवास केला जाईल तेव्हा प्रवास कालावधीचा ५०% दैनिक भत्ता शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रवास भत्ता देयकातून कमी केला जाईल.

**<u>तात्काळ आरक्षण शुल्क:-</u>** वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील तात्काळ आरक्षण शुल्कासंबंधीची तरतूद पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे:-

शासकीय कर्मचाऱ्यांना तातडीच्या परिस्थितीत मंत्री / प्रशासनिक विभागाच्या सचिवांनी मंत्रालयात आयोजित केलेल्या बैठकांनिमित्त राज्यातील कोणत्याही ठिकाणाहून मुंबई येथे जाण्यासाठी व परतीच्या प्रवासासाठी, विधीमंडळ कामकाजास्तव राज्यातील कोणत्याही ठिकाणाहून मुंबई / नागपूर येथे जाण्यासाठी व परतीच्या प्रवासासाठी आणि न्यायालयीन कामकाजास्तव राज्यातील कोणत्याही ठिकाणाहून दिल्ली / मुंबई / नागपूर / औरंगाबाद येथे जाण्यासाठी व परतीच्या प्रवासासाठी रेल्वेचे सर्वसाधारण आरक्षण सेवेद्वारे तिकीट उपलब्ध न झाल्यास, तात्काळ आरक्षण सुविधेचा लाभ अनुज्ञेय राहील. मात्र, नियंत्रक अधिकाऱ्यांनी प्रवासाची निकड प्रमाणित करणे आवश्यक असेल.

**<u>एजन्सी शुल्क:-</u>** वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील याविषयीची तरतूद पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे:-

प्रवास भत्त्यावरील, मुख्यत्वे विमान प्रवासावरील खर्च कमी व्हावा म्हणून, स्वेच्छा निर्णयानुसार विमान प्रवास अनुज्ञेय असलेल्या कर्मचाऱ्यांना रेल्वे आरक्षणासाठी रेल्वेने परवाना दिलेल्या अधिकृत एजन्सीने आकारलेल्या शुल्काची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

४.३ <u>सार्वजनिक वाहनातून रस्ता मार्गाने प्रवास (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४१४ आणि ४९०)</u>

| अ.क्र. | शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | प्रवास भत्याची पात्रता |
|---|---|---|
| १ | रुपये ६,६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) | वातानुकुलित बससहित इतर सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे |
| २ | रुपये ४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/-पेक्षा कमी | वातानुकुलित बसखेरीज इतर सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे |
| ३ | रुपये ४,४००/- पेक्षा कमी | सर्वसाधारण सार्वजनिक बसचे प्रत्यक्ष भाडे |

४.४. <u>बोटीने प्रवास (समुद्र आणि नदी ) (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४०६ आणि ४९०):-</u>

समुद्र अथवा नदीवरील बोटीच्या प्रवासासाठी पात्रता खालीलप्रमाणे असेल:-

| श्रेणी | शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | समुद्र किंवा नदीवरील बोटीच्या वर्गाची पात्रता |
|---|---|---|
| प्रथम श्रेणी | रुपये ६,६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) | उच्चतम वर्ग |
| द्वितीय श्रेणी | अ) रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी | दोन वर्गातील वरचा, तीनमधील मधला वर्ग, चार मधील दुसरा, |
| | ब) रु.४,२००/-व त्याहून अधिक मात्र रु.४,४००/- पेक्षा कमी | दोन वर्गामधील खालचा, तीनमधील मधला वर्ग, चारमधील तिसरा. |
| तृतीय श्रेणी | रुपये ४,२००/- पेक्षा कमी | निम्नतम वर्ग. |

४.५ रेल्वेने जोडलेल्या अथवा न जोडलेल्या दोन विवक्षित ठिकाणांदरम्यान वाहतूक अधिकाऱ्यांनी दर प्रमाणित केलेल्या टॅक्सीमधील एक आसन भाड्याने घेतल्यास अशा प्रकरणी, जर ती दोन ठिकाणे रेल्वेने जोडलेली असतील तर आलेला प्रत्यक्ष खर्च संबंधितास त्या मार्गावर उपलब्ध असलेल्या रेल्वेच्या अनुज्ञेय वर्गाच्या भाड्याशी सिमित करुन आणि जर ती दोन ठिकाणे रेल्वेने जोडलेली नसतील तर सार्वजनिक परिवहन सेवेच्या त्या मार्गावर उपलब्ध असलेल्या अनुज्ञेय वाहनाच्या भाड्याशी सीमित करुन देण्याची वरील (१) येथील दि.४डिसेंबर, १९९९ च्या आदेशातील तरतूद यापुढेही चालू राहील.

**४.६ प्रवासाची तिकीटे रद्द करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची प्रतिपूर्ती:-**

शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.टीआरए-१००४/प्र.क्र.२७/सेवा-५, दिनांक १० जून, २००४ मधील प्रवासाची तिकीटे रद्द करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काच्या प्रतिपूर्तीसंबंधीची पुढील तरतूद तशीच चालू राहील:-

शासकीय कामकाजानिमित्त विमानाने /रेल्वेने/सार्वजनिक बससेवेच्या बसने प्रवास करण्यासाठी आरक्षित केलेले तिकिट रद्द करण्यात आल्यास, आरक्षण रद्द करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची (Cancellation Charge) शासकीय कर्मचाऱ्यास प्रतिपूर्ती करण्यात येईल. तात्काळ आरक्षण सेवेचा लाभ घेऊन खरेदी केलेले रेल्वे प्रवासाचे तिकिट रद्द

करण्यासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची कर्मचाऱ्यास प्रतिपुर्ती करण्यात येईल. अशा प्रकरणी रेल्वे प्रशासनाने कोणताही परतावा नाकारला असेल तर तिकिट आरक्षित करण्यासाठी खर्च कराव्या लागलेल्या संपूर्ण रकमेची त्याला प्रतिपूर्ती करण्यात येईल. मात्र वरील दोन्ही प्रकरणी, लोकहितास्तव वा शासकीय कर्मचाऱ्याच्या नियंत्रणाबाहेरील कारणांसाठी तिकिट रद्द करावे लागत असल्याचे त्याच्या नियंत्रक अधिकाऱ्याने प्रमाणित केले पाहिजे.

## ५. किलोमीटर भत्ता (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४१४ (१) आणि (२):-

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील मालकीच्या अथवा भाड्याच्या वाहनातून * केलेल्या प्रवासासाठी अनुज्ञेय असलेल्या किलोमीटर भत्त्याचे दर खालीलप्रमाणे सुधारण्यात येत आहेत:-

| श्रेणी | शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | मोटार कार/जीप | | मोटार सायकल/ स्कूटर/ ऑटोरिक्षा | मोपेड/ लूना | अन्य वाहने |
|---|---|---|---|---|---|---|
| | | पेट्रोल | डिझेल | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. |
| प्रथम श्रेणी | रुपये ६,६००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) ** | ९.०० | ७.०० | ३.५० | १.७५ | -- |
| द्वितीय श्रेणी | अ) रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी ** | ९.०० | ७.०० | ३.५० | १.७५ | १.०० |
| | ब) रु.४,२००/-व त्याहून अधिक मात्र रु.४,४००/- पेक्षा कमी | -- | -- | ३.५० | १.७५ | १.०० |
| तृतीय श्रेणी | रुपये ४,२००/- पेक्षा कमी | -- | -- | -- | १.७५ | १.०० |

* टीप-१) ज्या ग्रेड वेतनाच्या समोर किलोमीटर भत्त्याचे दर दर्शविण्यात आले आहेत त्या ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी त्या प्रकारचे वाहन बाळगण्यास पात्र समजण्यात येतील.

** टीप-२) ग्रेड वेतनगटातील अधिकारी टॅक्सीने प्रवास केल्यास स्तंभ ३ मधील दराने किलोमीटर भत्ता मिळण्यास पात्र असतील.

## ५-अ) आनुषंगिक प्रवासाचा खर्च-

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील याविषयीची पुढील तरतूद तशीच चालू राहील:-

दौऱ्यानिमित्त करावयाच्या मुख्य प्रवासाच्या अनुषंगाने करावयाचा आनुषंगिक (म्हणजे कामाच्या ठिकाणापासून रेल्वे/विमान/बस स्थानकापर्यंतच्या व परत असा) प्रवास शासकीय कर्मचाऱ्यास दौऱ्यासाठी अनुज्ञेय असलेल्या रेल्वे/सार्वजनिक बस सेवेच्या अनुज्ञेय वर्गाने करण्याची आणि वरील वाहनांव्यतिरिक्त इतर साधनांनी प्रवास केल्यास त्यासाठीचा प्रत्यक्ष खर्च हा त्या वाहनासाठी विहित केलेल्या किलोमिटर भत्त्याच्या दराशी सिमित करुन देण्याची तरतूद यापुढेही अनुज्ञेय राहील. **आनुषंगिक प्रवास खर्चाचा समावेश मूळ प्रवास भत्ता देयकातच करणे आवश्यक आहे.**

५-ब) <u>प्रवासाच्या प्रारंभाचे ठिकाण (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ३९८)-</u>

शासन निर्णय, वित्त विभाग क्र. टीआरए-१०७७/प्र.क्र.१५६-सी/सेवा-५, दि.११ ऑगस्ट, १९७७ च्या आदेशांतील परिच्छेद ३ मधील सध्याच्या तरतुदीमध्ये पुढील परंतुकाचा समावेश करण्यात येत आहे:-

परंतु रेल्वे, विमान अथवा बसच्या निर्गमनाची वेळ आणि ठिकाण हे दौऱ्याची सुरूवात कामाच्या ठिकाणाहून सुरू करण्यासाठी सोयीचे नसेल आणि कर्मचाऱ्यास त्याच्या निवासस्थानाहून दौऱ्याची सुरूवात करावी लागत असेल अशा प्रसंगी आनुषंगिक खर्च मंजूर करताना निवासस्थानापासून रेल्वे, विमान अथवा बसस्थानकापर्यंतचा प्रवास विचारात घ्यावा. मात्र, नियंत्रक अधिकाऱ्याने यासंबंधी खातरजमा करणे आवश्यक असेल.

या परंतूकाच्या प्रयोजनार्थ कर्मचाऱ्याचे निवासस्थान त्याच्या मुख्यालयाच्या शहराच्या नागरी समूहक्षेत्राच्या हद्दीत असणे आवश्यक राहील. शहराच्या नागरी समूहाची हद्द ही घरभाडेभत्त्याच्या मंजुरीच्या प्रयोजनार्थ विहित केल्याप्रमाणे असेल.

६. <u>रिकाम्या मोटारीची वाहतूक (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४६२):-</u>

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या परिच्छेद ६ मधील रिकाम्या मोटार वाहतुकीच्या भत्त्याचा दर सुधारून रु.५.०० प्रति किलोमीटर करण्यात येत आहे. मात्र त्यासाठी येणारा खर्च, रेल्वेने/बोटीने अथवा अन्य वाहनाने वाहतूक करण्यासाठी येणाऱ्या खर्चापेक्षा अधिक नसावा व शासकीय कर्मचाऱ्याने स्वत: प्रत्यक्षात रेल्वेने किंवा बोटीने प्रवास केलेला असावा, ही अट यापुढेही लागू राहील.

७. <u>वाहनभत्ता (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ३८८):-</u>

शासकीय कर्मचाऱ्याने, त्याची दैनंदिन कर्तव्ये पार पाडताना, त्याच्या कार्यक्षेत्रात केलेल्या प्रवासासाठी मंजूर करण्यात येणाऱ्या वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील परिच्छेद ७ मधील वाहनभत्त्याच्या दरांत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे. वाहनभत्त्याच्या मंजुरीविषयीच्या अन्य तरतुदी यापुढेही तशाच चालू राहतील.

| वाहनभत्त्याचे सुधारित दर | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| मासिक सरासरी किलोमीटर | मोटार कार | | मोटार सायकल/ स्कूटर | मोपेड/लुना | सार्वजनिक वाहने |
| | पेट्रोल | डिझेल | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | **रुपये** | **रुपये** | **रुपये** | **रुपये** | **रुपये** |
| २०१-३०० | ६०० | ४६० | २४० | १७० | १५० |
| ३०१-४५० | ९०० | ६६० | ३६० | २१० | १९० |
| ४५१-६०० | १३४० | १००० | ५४० | २५० | २३० |
| ६०१-८०० | १८०० | १३६० | ७२० | २९० | २५० |
| ८०१ व त्याहून अधिक | २४०० | १८०० | ९६० | ३७० | २७० |

८. <u>सायकल भत्ता (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ३८९):-</u>

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ मधील परिच्छेद ८ मधील तरतूदीमध्ये सुधारणा करून, सायकल भत्त्याचा दर रु.६० प्रतिमाह करण्यात येत आहे.

९. <u>दैनिक भत्ता (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४२०):-</u>

वरील (४) येथील दि.१९जून, २००६च्या शासन निर्णयामधील दैनिक भत्ताविषयक तरतुदी पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहेत:-

अ) कर्मचाऱ्याने शासकीय विश्रामगृहात वास्तव्य केल्यास / स्वत: राहण्याची अन्य व्यवस्था केल्यास मंजूर करावयाचे दैनिक भत्त्याचे सुधारित दर खालीलप्रमाणे असतील:-

**तक्ता-अ**

| अ. क्र | श्रेणी | शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरु, हैदराबाद | देशातील / राज्यातील 'अ' वर्ग शहरे | देशातील / राज्यातील 'ब-१' वर्ग शहरे | अन्य स्तंभात समाविष्ट नसलेली शहरे / गावे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| १ | प्रथम श्रेणी | अ) रु.८,९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) | ३२५ | २०० | १६० | १३० |
| | | ब) रु.६,६००/- व त्याहून अधिक मात्र रु.८,९००/- पेक्षा कमी | २९० | १८० | १४० | १२० |
| २ | व्दितीय श्रेणी | अ) रु.५,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी | २९० | १८० | १४० | १२० |
| | | ब)रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.५,४००/- पेक्षा कमी | २२५ | १५० | १४० | ११० |
| ३ | तृतीय श्रेणी | अ) रु.४,२००/- व रु.४,३००/- | २१० | १३० | १३० | ११० |
| | | ब)रु.४,२००/- पेक्षा कमी | १६० | १२५ | १२५ | १०० |

ब) अनुसूचित दर आकारणाऱ्या हॉटेलमध्ये वास्तव्य केल्यास दैनिक भत्त्याचे सुधारित दर खालीलप्रमाणे असतील:-

**तक्ता-ब**

| अ. क्र | श्रेणी | शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरु, हैदराबाद | देशातील / राज्यातील 'अ' वर्ग शहरे | देशातील / राज्यातील 'ब-१' वर्ग शहरे | अन्य स्तंभात समाविष्ट नसलेली शहरे / गावे |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| १ | प्रथम श्रेणी | अ) रु.८,९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) | १००० | ८०० | ६५० | ५०० |
| | | ब) रु.६,६००/- व त्याहून अधिक मात्र रु.८,९००/- पेक्षा कमी | ७५० | ६०० | ५०० | ३५० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | व्दितीय श्रेणी | अ) रु.५,४००/- व त्याहून अधिक मात्र रू.६,६००/- पेक्षा कमी | ७५० | ६०० | ५०० | ३५० |
| | | ब)रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रू.५,४००/- पेक्षा कमी | ५७५ | ४५० | ३७५ | ३०० |
| ३ | तृतीय श्रेणी | अ) रु.४,२००/- व रू.४,३००/- | ३७५ | ३०० | २५० | २०० |
| | | ब)रु.४,२००/- पेक्षा कमी | ३०० | २२५ | २२५ | १५० |

टीप:- १) वर नमूद केलेली 'अ' आणि 'ब-१' शहरे ही स्थानिक पूरक भत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या वर्गीकरणाप्रमाणे राहतील. मात्र स्थानिक पूरक भत्त्याच्या मंजूरीसाठी निम्न वर्गीकरण प्राप्त झालेल्या काही शहरांचे जुनेच वर्गीकरण अनुसरण्याविषयीची सवलत दैनिक भत्त्याच्या मंजूरीसाठी लागू असणार नाही.

देशातील व राज्यातील 'अ' आणि 'ब-१' शहरे पुढीलप्रमाणे आहेत.

<u>'अ' वर्ग शहरे</u> - पुणे, नागपूर (महाराष्ट्र), अहमदाबाद, सुरत (गुजरात), जयपूर (राजस्थान), लखनौ, कानपूर (उत्तर प्रदेश).

**<u>'ब' वर्ग शहरे</u>** - नाशिक (महाराष्ट्र), विजयवाडा, विशाखापट्टणम (आंध्रप्रदेश), पाटणा (बिहार), राजकोट, वडोदरा (गुजरात), फरीदाबाद (हरियाणा), जमशेदपूर, धनबाद (झारखंड), कोच्ची (केरळ), जबलपूर, भोपाळ, इंदोर (मध्यप्रदेश), अमृतसर, लुधियाना (पंजाब), कोईंबतूर, मदुराई (तामिळनाडू), मेरठ, आग्रा, अलाहाबाद, वाराणसी (उत्तर प्रदेश), असनसोल (पश्चिम बंगाल).

टीप:- २) हॉटेल वास्तव्यासाठी दैनिक भत्त्याची मागणी करताना शासकीय कर्मचाऱ्यास हॉटेलमध्ये राहण्याचा / राहण्याचा व जेवणाचा आलेला प्रत्यक्ष खर्च, सर्वसाधारणपणे अनुज्ञेय असलेल्या दैनिक भत्त्याच्या रकमेपेक्षा अधिक आहे हे दर्शविणारी एकच पावती सादर करण्याची तरतूद यापुढेही चालू राहील.

**१०. <u>कायम प्रवासभत्ता ( मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ३८३)</u> :-**

कायम प्रवासभत्ता बंद करण्यापूर्वी ज्या पदांसाठी कायम प्रवासभत्ता मंजूर करण्यात आला होता, अशी पदे धारण करणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रवासभत्त्यावरील दरमहा आर्थिक मर्यादा ही, वरील परिच्छेद-९ मधील तक्ता - अ च्या स्तंभ ७ मध्ये विहित केलेल्या दैनिकभत्त्याच्या दराने १५ दिवसांच्या दैनिकभत्त्याच्या रकमेइतकी असेल.

**११. <u>बदली प्रवास भत्ता (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४९०):-</u>**

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ मध्ये विहित केलेली कुटुंबाची व्याख्या पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे. शासकीय कर्मचाऱ्याचे कुटूंबिय त्याला अनुज्ञेय असलेल्या श्रेणी /वर्गाने प्रवास करण्यास पात्र आहेत.

**(अ) <u>कुटुंबाची व्याख्या</u>:- महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ मधील नियम ९ (१६):-**

कुटूंब म्हणजे यथास्थिती शासकीय कर्मचा-यांबरोबर राहणारी त्याची पत्नी किंवा राहणारा तिचा पती आणि शासकीय कर्मचाऱ्यांबरोबर राहणारी आणि संपूर्णपणे त्याच्यावर अवलंबून

असणारी औरस मुले व सावत्र मुले. याशिवाय, या संज्ञेत, शासकीय कर्मचाऱ्याबरोबर रहात असतील आणि संपूर्णपणे त्याच्यावर अवलंबून असतील तर त्याचे आई-वडील, बहीण आणि अज्ञान भाऊ यांचा समावेश होतो.

टीप-१:- ह्या प्रयोजनार्थ "कुटुंब" या संज्ञेमध्ये एकाहून अधिक पत्नींचा समावेश होत नाही.

टीप-२:- जर शासकीय कर्मचाऱ्याच्या व्यक्तिगत कायद्याप्रमाणे, दत्तक मुलाला नैसर्गिक मुलाचा दर्जा देणाऱ्या दत्तकविधानास कायदेशीर मान्यता मिळालेली असेल तर ते दत्तक मूल औरस मूल समजण्यात येईल.

स्पष्टीकरण:- १) कुटुंब या संज्ञेत दिनांक १५ सप्टेंबर, २००० या दिनांकापासून केवळ २ मुलांचा समावेश असेल, परंतु ही अट दिनांक १४ सप्टेंबर, २००० पर्यंत २ पेक्षा जास्त मुले असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास लागू असणार नाही. तसेच एकही मूल नसलेल्या आणि दिनांक १४ सप्टेंबर, २००० रोजी वा त्यानंतर एक मूल असताना, पुढील प्रसूतीत एकापेक्षा जास्त मुलांचा जन्म झाल्यामुळे त्यांची संख्या दोन पेक्षा अधिक झालेल्या मुलांचाही समावेश असेल.

२) या प्रयोजनार्थ अविवाहित मुली, विधवा मुली व "गार्डीयन्स ॲन्ड वॉडर्स ॲक्ट, १८९०" खाली पालकत्व स्विकारलेले मूल जे शासकीय कर्मचा-यासोबत राहते व ज्यास शासकीय कर्मचाऱ्याच्या कुटुंबाचा सदस्य म्हणून मान्यता आणि विशेष मृत्युपत्राद्वारे औरस मुलाचा दर्जा दिला आहे अशा मुलाचाही समावेश होतो.

३) घटस्फोटीत, परित्यक्ता किंवा पतीपासून वेगळी आणि पालकासोबत राहणाऱ्या आणि त्याच्यावर आर्थिकदृष्टया अवलंबित असणाऱ्या विवाहित मुलींचाही समावेश आहे.

४) बहिणींमध्ये शासकीय कर्मचाऱ्यासोबत राहणाऱ्या व त्याच्यावर पूर्णपणे अवलंबित असणाऱ्या विधवा बहिणी, ज्यांचे वडील हयात नाहीत किंवा असल्यास ते शासकीय कर्मचा-यावर अवलंबून आहेत, यांचाही समावेश आहे.

५) शासकीय कर्मचाऱ्यासोबत राहणाऱ्या व त्याच्यावर पूर्णपणे अवलंबित असणाऱ्या सावत्र आईचाही समावेश आहे.

टीप:- या व्याख्येच्या प्रयोजनार्थ शासकीय कर्मचाऱ्यावर पूर्णपणे अवलंबित व्यक्ती म्हणजे ज्या व्यक्तीचे दरमहा उत्पन्न हे दरमहा रु.२८८२ मूळ निवृत्तिवेतन आणि त्यावरील महागाई वाढ यांच्या एकत्रित रकमेपेक्षा कमी असेल असा कुटूंबाचा सदस्य.

**ब) <u>बदलीनिमित्त खाजगी/भाड्याच्या वाहनाने प्रवास</u> (मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील नियम ४९०):-**

रेल्वे/सार्वजनिक बसने न जोडलेल्या ठिकाणांदरम्यान * बदली निमित्त खाजगी/भाड्याच्या वाहनाने केलेल्या प्रवासासाठी किलोमीटर भत्त्याची रक्कम :-

वरील (१) येथील दि.४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील परिच्छेद १० मधील तरतूद पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे:

शासकीय कर्मचाऱ्याने आणि/किंवा त्यांच्या कुटुबियांनी रेल्वे/सार्वजनिक बसने न जोडलेल्या ठिकाणांदरम्यान बदली निमित्त खाजगी/भाड्याच्या वाहनाने केलेल्या प्रवासाचा प्रत्यक्ष खर्च त्याला अनुज्ञेय असलेल्या किलोमीटरभत्त्याच्या रकमेशी सीमित करुन मंजूर करण्यात येईल.

*टीप:- दोन्ही ठिकाणे रेल्वेने जोडली असल्यास मात्र आलेला खर्च हा त्या मार्गावर रेल्वेच्या उपलब्ध असलेल्या अनुज्ञेय वर्गाच्या भाड्याशी सिमित करुन देण्यात येईल.

**क) <u>संयुक्त बदली अनुदान:-</u>**

वरील (३) येथील दि. ६ जानेवारी, २००६ च्या आदेशांतील संयुक्त बदली अनुदानाचे दर पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहेत. मात्र त्यासाठी बदलीनंतर शासकीय कर्मचाऱ्याच्या निवासस्थानात बदल होण्याची अट यापुढेही लागू राहील.

| अ.क्र. | बदलीचा प्रकार | संयुक्त बदली अनुदानाचा दर |
|---|---|---|
| १ | २. | ३. |
| १ | त्याच मुख्यालयात | वेतनाच्या (वेतनबँडमधील वेतन + ग्रेड वेतनाच्या) १/३ इतकी रक्कम |
| २ अ) | नवीन व जुन्या मुख्यालयातील अंतर २० कि.मी. पेक्षा कमी असल्यास | वेतनाच्या (वेतनबँडमधील वेतन + ग्रेड वेतनाच्या) १/३ इतकी रक्कम |
| ब) | नवीन व जुन्या मुख्यालयातील अंतर २० कि.मी. या त्यापेक्षा अधिक असल्यास. | वेतनाच्या (वेतनबँडमधील वेतन + ग्रेड वेतनाच्या) १/२ इतकी रक्कम |

कर्मचाऱ्यांना बदली निमित्तच्या प्रवासासाठी मिळणारा दैनिक भत्ता व मुंबई नागरी सेवा नियम, १९५९ मधील तरतूदीनुसार अनुज्ञेय असलेला बदलीनिमित्तच्या आनुषंगिक प्रवासाचा (म्हणजे जुन्या व नव्या मुख्यालयाच्या ठिकाणचे निवास स्थान आणि रेल्वे स्टेशन/ बस स्थानक/विमानतळ या दरम्यानच्या प्रवासाचा किंवा त्याच मुख्यालयीच्या बदलीनंतरच्या प्रवासाचा) खर्च यापुढेही वेगळा अनुज्ञेय ठरणार नाही.

**ड) <u>वैयक्तिक सामानाच्या वाहतूकीसाठी अनुज्ञेयता:-</u>**

वरील (१) येथील दि. ४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील याविषयीच्या तरतूदी पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहेत.

**(१) <u>रेल्वे वाहतूक</u>:-** वेतन मर्यादा आणि वैयक्तिक सामानाच्या वहनाची पात्रता खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे असेल.शासकीय कर्मचारी वैयक्तिक सामान स्वत:च्या जोखमीवर खालील तक्त्यातील रकाना ३ मध्ये दर्शविलेल्या मर्यादेपर्यंत मालगाडीने वाहून नेण्याचा प्रत्यक्ष खर्च मिळण्यास पात्र असेल. या प्रयोजनार्थ कुटूंब असलेला किंवा कुटूंब नसलेला असा फरक राहणार नाही.

| श्रेणी | शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | रेल्वे |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| प्रथम श्रेणी | अ) रु.८,९००/- व त्याहून अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) | मालगाडीने ६००० कि.ग्रॅ. किंवा ४ चाकांची पूर्ण वॅगन किंवा १ दुहेरी कंटेनर प्रत्यक्षात आरक्षित केलेली/केला असल्यास. |
| | ब) रु.६,६००/- व त्याहून अधिक मात्र रू.८,९००/- पेक्षा कमी | मालगाडीने ६००० कि.ग्रॅ. किंवा ४ चाकी पूर्ण वॅगन किंवा १ एकेरी कंटेनर प्रत्यक्षात आरक्षित केलेली/केलेला असल्यास |
| द्वितीय श्रेणी | अ) रु.५,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी | मालगाडीने ६००० कि.ग्रॅ. किंवा ४ चाकी पूर्ण वॅगन किंवा १ एकेरी कंटेनर प्रत्यक्षात आरक्षित केलेली/केलेला असल्यास |
| | ब)रु.२,८००/- व त्याहून अधिक मात्र रु.५,४००/- पेक्षा कमी | मालगाडीने ३००० कि.ग्रॅ. |
| तृतीय श्रेणी | अ) रु.२,८००/- पेक्षा कमी | मालगाडीने १५०० कि.ग्रॅ. |

**२) रस्त्याने वाहतूक :-** दोन्ही ठिकाणे रेल्वेने जोडलेली असताना, शासकीय कर्मचाऱ्याने वैयक्तिक सामान रस्त्याने वाहून नेल्यास वैयक्तिक सामानाच्या वाहतूकीचा प्रत्यक्ष खर्च किंवा मालगाडीने वाहतुकीसाठी अनुज्ञेय असलेल्या खर्चाच्या २५ टक्के वाढीव रक्कम यापैकी जे कमी असेल ते मिळण्यास तो यापुढेही पात्र असेल.

३) **<u>रेल्वेने न जोडलेल्या ठिकाणांमध्ये वैयक्तिक सामानाची वाहतूक:-</u>**

शासकीय कर्मचाऱ्याला वैयक्तिक सामान रस्त्याने वाहून नेण्यासाठी खालील दराने किलोमीटर भत्ता मंजूर करण्यात येईल.

| शासकीय कर्मचारी धारण करीत असलेल्या पदाचे ग्रेड वेतन | अ-१/अ/ब-१ वर्ग शहरे (रु.प्रति कि.मी.) | इतर शहरे (रु.प्रति कि.मी.) |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| रु.५,४००/- व त्यापेक्षा अधिक आणि उच्च प्रशासकीय श्रेणी + (HAG + श्रेणी) | ४८.०० | ३०.०० |
| रु.४,४००/- व त्यापेक्षा अधिक मात्र रू.५,४००/- पेक्षा कमी | २४.०० | १५.०० |
| रु.४,४०० पेक्षा कमी | १२.०० | ७.५० |

**टीप:-** स्तंभ २ मधील किलोमीटर भत्त्याचा उच्च दर, अ-१/अ/ब-१ शहरांच्या (शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक घभाभ-१००५/प्र.क्र.१३/सेवा-५, दिनांक १७ जून, २००५ अन्वये स्थानिक पूरकभत्त्याच्या प्रयोजनार्थ केलेल्या वर्गीकरणानुसार) हद्दीत एका ठिकाणापासून दुसऱ्या ठिकाणी वैयक्तिक सामानाची वाहतूक केल्या प्रकरणी अनुज्ञेय असेल.

४) **<u>वाहनाची वाहतूक</u>:-** वाहनांच्या वाहतूकीसाठीचे दर खालीलप्रमाणे असतील:-

| | | रु.प्रति कि.मी. |
|---|---|---|
| अ) | मोटार कार | ५.०० |
| ब) | मोटार सायकल/स्कूटर | १.६० |
| क) | मोपेड /लूना | ०.८० |
| ड) | सायकल | ०.५० |

टीप:- या शासन निर्णयातील परिच्छेद ५ मधील तरतूदीनुसार बाळगण्यास पात्र असणाऱ्या वाहन प्रकारांपैकी एका वाहनाच्या वाहतुकीचा खर्च अनुज्ञेय राहील. तसेच शासन निर्णय, वित्त विभाग क्र. टीआरए-१०७७/प्र.क्र.१५६-सी/सेवा-५, दि.११ ऑगस्ट, १९७७ मधील रेल्वेने वाहनांची वाहतूक करण्याबाबतची तरतूद या पुढेही अंमलात राहील.

इ) **<u>बदली होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यास अनुज्ञेय वर्गाचे अतिरिक्त भाडे-</u>**

बदलीनंतर नव्या मुख्यालयाच्या ठिकाणी शासकीय निवासस्थान न मिळाल्यामुळे कुटुंब जुन्याच मुख्यालयी ठेवल्याच्या प्रकरणी, नवीन मुख्यालयात रुजू होण्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत सर्वसाधारण बदली प्रवास भत्त्याशिवाय, नवीन मुख्यालय ते जुने मुख्यालय या दरम्यान जाता-येतानांच्या दोन्ही प्रवासासाठी अनुज्ञेय वर्गाचे अतिरिक्त भाडे द्यावयाची वरील (१) येथील दि. ४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील परिच्छेद १० मधील तरतूद यापुढेही चालू राहील.

फ) **<u>दुसऱ्या शासनाकडील बदली (मुंबई नागरी सेवा नियम,१९५९ मधील नियम ५०६-बी):-</u>**

दुसऱ्या शासनाकडे तात्पुरत्या बदलीवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना त्या शासनाकडील पदावर रुजू होण्यासाठी व परतीच्या प्रवासासाठी द्यावयाच्या प्रवास भत्त्याच्या बाबतीत त्यांची प्रवास भत्त्याची मागणी, उसनवारीवर घेणाऱ्या शासनाच्या नियमानुसार किंवा या राज्य शासनाच्या नियमानुसार विनियमित करण्याबाबतचा विकल्प देण्याची वरील (१) येथील दि.४डिसेंबर, १९९९च्या आदेशांतील परिच्छेद १० मधील तरतूद यापुढेही चालू राहील.

१२. <u>अशासकीय सदस्यांचा प्रवासभत्ता (मुंबई नागरी सेवा नियम खंड २ परिशिष्ट ४२-ए विभाग-एक)</u>:-

वरील (१) येथील दि. ४ डिसेंबर, १९९९ च्या आदेशांतील परिच्छेद ११ मधील तरतूद पुढीलप्रमाणे सुधारण्यात येत आहे:-

"राज्य/विभाग/जिल्हा स्तरावरील समिती/मंडळ/आयोग यावर नियुक्त केलेल्या अशासकीय सदस्यांना रु.८,९००/- व त्याहून अधिक ग्रेड वेतन असणाऱ्या शासकीय कर्मचा-यांच्या दराने प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय असेल; मात्र त्यांना विमान प्रवास आणि रेल्वेच्या वातानुकुलित प्रथम वर्गाचा प्रवास अनुज्ञेय असणार नाही. तालुका स्तरावरील समिती/मंडळ/आयोग यावर नियुक्त केलेल्या अशासकीय सदस्यांना रु.४२००/- ग्रेड वेतन असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या दराने प्रवासभत्ता मिळेल. तसेच हे सदस्य रु.४२००/- ग्रेड वेतन असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या दराने दैनिक भत्ता मिळण्यास पात्र असतील. समिती/मंडळ/आयोग वगैरेंवर अशासकीय सदस्य म्हणून नियुक्त झालेल्या आमदार/खासदार यांचा प्रवासभत्ता/दैनिक भत्ता, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक-टिआरए-१४७०/१३१/अठरा, दिनांक २७ जानेवारी १९७१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आमदार व खासदार यांना विधानमंडळाच्या कामकाजासाठी अनुज्ञेय असलेल्या दराप्रमाणे नियमित केला जाईल"

प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील समित्या/मंडळ/आयोग वगैरेंवर अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीच्या आदेशात त्यांच्या प्रवासभत्त्याबाबत वरीलप्रमाणे स्वतंत्र परिच्छेद अंतर्भूत करण्यात यावा. अशासकीय सदस्यांच्या प्रवासभत्ता मंजुरीसाठी रेल्वेच्या अनुज्ञेय वर्गाने केलेल्या प्रवासाच्या तिकीटाचा क्रमांक, दिनांक इत्यादी तपशील देण्याची आवश्यकता नाही.

१३. <u>सेवानिवृत्तिनंतर/मृत्यूनंतर प्रवास भत्ता</u>:-

वरील परिच्छेद ११ मधील बदली प्रवास भत्त्याच्या सुधारीत तरतूदी, सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी व त्याचे कुटुंब किंवा मृत शासकीय कर्मचाऱ्यांचे कुटुंब यांना लागू होतील.

१४. विमान / राजधानी, शताब्दी एक्सप्रेसने प्रवास अनुज्ञेय नसलेल्या कर्मचाऱ्यांनी **स्वेच्छेने** या वाहनांनी प्रवास केल्यास आलेला प्रत्यक्ष खर्च त्याला अनुज्ञेय असलेल्या रेल्वेच्या वर्गाच्या भाड्याशी सीमित करुन मंजूर करण्यात येईल. तसेच, कर्मचाऱ्याने **स्वेच्छेने** रेल्वे/सार्वजनिक बसच्या त्याला अनुज्ञेय असलेल्या वर्गापेक्षा उच्च वर्गाने प्रवास केल्यास त्याला त्या प्रवासाचा प्रत्यक्ष खर्च रेल्वेच्या वा सार्वजनिक बसच्या अनुज्ञेय वर्गाच्या भाड्याशी सीमित करुन मंजूर करण्यात येईल.

१५. <u>अंमलबजावणीचा दिनांक</u> :-

**अ) हे आदेश दि. १ एप्रिल, २०१० पासून अंमलात येतील.** मात्र प्रत्यक्ष प्रवास हा दि.३१मार्च, २०१० च्या मध्यरात्री १२.०० नंतर सुरू होणे आवश्यक आहे.

**ब)** दि. १ एप्रिल, २०१० पूर्वी ज्या शासकीय कर्मचाऱ्याची बदली झाली असेल किंवा जो सेवानिवृत्त झाला असेल त्याचे कुटुंबिय आणि किंवा वैयक्तिक सामान दिनांक दि. १ एप्रिल,२०१० रोजी किंवा त्यानंतर परंतु नवीन मुख्यालयाच्या ठिकाणी त्याने कार्यभार स्विकारण्याच्या/सेवानिवृत्तीच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत हलविले असल्यास अशा प्रकरणी वरील परिच्छेद ११ मधील सुधारित तरतूदी लागू राहतील.

मुंबई नागरी सेवा, नियम १९५९ मधील यासंबंधीच्या सध्याच्या तरतूदी या आदेशांच्या मर्यादेपर्यंत सुधारित करण्यात आल्या आहेत, असे समजले जावे. या नियमांना औपचारिक सुधारणा यथावकाश करण्यात येईल. याखेरीज, प्रवासभत्त्याविषयी वेळोवेळी विहित करण्यात आलेल्या अन्य तरतुदी यापुढेही लागू राहतील.

या आदेशांच्या परिणामी होणारा अतिरिक्त खर्च संबंधित विभाग / कार्यालय यांनी आपआपल्या मंजूर अनुदानातून भागवावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, त्याचा संगणक संकेतांक २०१००३०४१३३५२५००१असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )
उप सचिव, वित्त विभाग

प्रति,

- महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
- महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखापरीक्षा), महाराष्ट्र, नागपूर.
- अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
- निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,
- राज्यपालांचे सचिव,
- मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
- उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
- सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
- मंत्रालयीन सर्व विभाग,
- सर्व विभागीय आयुक्त,
- मंत्रालयाच्या सर्व विभागाखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
- *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
- *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
- *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
- *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
- *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
- सिनियर रिसर्च ऑफिसर, पे रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
- संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
- मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई,
- उपमुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी हिशेब, मुंबई / पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक / अमरावती.
- जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई,
- सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
- सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
- सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
- वित्त विभागातील सर्व कार्यासने,
- निवडनस्ती, वित्त विभाग/सेवा-५

* पत्राद्वारे

------------/--